# अपिलीय प्राधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने शिक्षेबाबत दिलेला आदेश किंवा सक्षम अधिकाऱ्याने इतर सेवाविषयक बाबींसंबंधी दिलेला आदेश मान्य नसल्यास कर्मचाऱ्यास अपील अर्ज किंवा पुनरीक्षण अर्ज करण्याची तरतूद नियमात केलेली आहे. विभागीय चौकशीचा अभिलेख मागवून, नियमानुसार देण्यात आलेल्या आदेशांचे पुनरीक्षण करण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकाऱ्यास असतो. अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करणे हा कर्मचाऱ्याचा हक्क आहे. अपीलीय अधिकाऱ्याने अपील अर्जांवर/ पुनरीक्षण अर्जावर निर्णय देताना किंवा स्वतःहून अन्यथा नियमातील तरतुदी तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अपील अर्जांवरील निर्णय सुसंगत व न्यायपूर्ण असणे अपेक्षित असते. अपीलीय प्राधिकरण हे अर्धन्यायिक प्राधिकरण असते. त्यामुळे अशा प्राधिकरणाने यांत्रिक पद्धतीने अपील निकालात काढणे हे न्यायाला धरून होणार नाही.

## ०२. अपील करता येते अशा बाबी :-

**महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ या नियमांच्या नियम १७ अन्वये कर्मचाऱ्यास खालील आदेशांविरुद्ध अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करता येते.**

१. निलंबनाचा किंवा मानीव निलंबनाचा आदेश.
२. शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने/अपीलीय अधिकाऱ्याने/पुनरीक्षण प्राधिकरणाने शिक्षा लादण्यासंबंधी काढलेला आदेश.
३. नियमांद्वारे/कराराद्वारे नियमित केलेले वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन किंवा इतर सेवाशर्ती तोट्याच्या ठरतील अशा प्रकारे नाकारणारा किंवा बदल करणारा आदेश.
४. सेवाप्रवेशानुसार व ज्येष्ठता क्रमानुसार देय असलेल्या पदोन्नतीपासून वंचित करणारा आदेश.
५. नियमातील किंवा करारातील तरतुदींचा तोट्याचा ठरेल अशा प्रकारे अर्थ लावणारा आदेश.
६. शिक्षा म्हणून नव्हे तर अन्यथा, निम्नसेवेत, श्रेणीत किंवा पदांवर पदावनत करणारा आदेश.

७. निवृत्तीवेतन, उपदान किंवा इतर सेवानिवृत्तीनंतरचे लाभ कमी करणारा/रोखणारा किंवा नाकारणारा आदेश.

८. निलंबन काळातील निर्वाह भत्ता किंवा इतर भत्ते निश्चित करणारा आदेश.

९. निलंबन काळातील किंवा बडतर्फ केल्याच्या/सेवेतून काढून टाकल्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून सेवेत, श्रेणीत किंवा पदांवर पूर्ववत घेण्याच्या तारखेच्या कालावधीचे वेतन व भत्ते निश्चित करणारा आदेश.

१०. निम्नश्रेणीच्या सेवेत, पदांवर, वेतनश्रेणीत किंवा वेतनश्रेणीच्या टप्प्यांवर पदावनत केल्याच्या तारखेपासून, सेवेत, श्रेणीत किंवा पदांवर पुनर्स्थापित करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीचे वेतन व भत्ते निश्चित करणारा आदेश.

११. निलंबित केल्याच्या तारखेपासून किंवा बडतर्फ करुन सेवेतून काढून टाकल्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून किंवा निम्नसेवाश्रेणीत, पदांवर किंवा वेतनश्रेणीतील खालच्या टप्प्यांवर पदावनत केल्याच्या तारखेपासून सेवेत, श्रेणीत किंवा पदांवर पुनर्स्थापित किंवा पूर्ववत केल्याच्या तारखेपर्यंतचा कालावधी कोणत्याही प्रयोजनासाठी त्याने कर्तव्यार्थ व्यतित केलेला कालावधी मानला जाईल किंवा कसे

## ०३. <u>अपील करता येत नाही अशा बाबी :-</u>

**नियम १९ मधील तरतुदींप्रमाणे खाली नमूद केलेल्या आदेशांविरुद्ध अपील करता येत नाही.**

१. राज्यपालांनी काढलेला कोणताही आदेश.

२. निलंबन आदेशांव्यतिरिक्त शिस्तभंग कार्यवाहीतील बादकालीन स्वरूपाचा किंवा सहाय्यक स्वरूपाचा किंवा प्रकरण अंतिमरित्या निकालात काढण्याबाबत कोणताही आदेश.

३. नियम ८ अन्वये चौकशी करताना चौकशी अधिकाऱ्यांनी काढलेले आदेश (उदा. चौकशीची तारीख ठरवून देणे, कागदपत्रांची मागणी नाकारणे वगैरे).

## ०४. मार्गदर्शक सूचना :-

अपिलीय प्राधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना पुढे नमूद केल्या आहेत. हे करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ या नियमातील तरतुदी शासनाने प्रसिद्ध केलेल्या विभागीय चौकशी नियम पुस्तिकेतील मार्गदर्शक सूचना, तसेच सर्वोच्च व उच्च न्यायालयांचे निर्णय विचारात घेतले आहेत.

१. अपील अर्जावर विचार करण्यापूर्वी आपण सक्षम अपीलीय अधिकारी आहात याची खात्री करा. नियम १८ मध्ये अपीलीय प्राधिकारी कोण आहेत हे नमूद केलेले आहे.
२. वरील परिच्छेद २ (नियम १७) मध्ये नमूद केलेल्या बाबीसंबंधातील आदेशांविरुद्ध अपील केलेले आहे याची खात्री करा.
३. अपील करण्यासाठी ४५ दिवसांची कालमर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे. (नियम १९) अपील करण्यास विलंब झाला असेल व झालेला विलंब क्षमापित करावा अशी विनंती केली असेल तर अशा विनंतीचा जरुर विचार करा. विलंबास रास्त व पुरेशी कारणे असतील तर विलंब क्षमापित करुन अपील अर्जावर नियमानुसार विचार करा व निर्णय द्या. विलंब क्षमापित केल्याने अपील अर्ज मंजूर होतो असे नव्हे ; मात्र विलंबाच्या कारणावरुन अपील नामंजूर केले तर कर्मचाऱ्याचे मूळ गाऱ्हाणे रास्त असून देखील त्याचा विचार केला जाणार नाही व ते अन्यायाचे ठरेल.
४. प्रत्येक अपील अर्जावर निर्णय देण्यापूर्वी, अर्जदारास आपले म्हणणे प्रत्यक्ष मांडण्याची संधी देणे बंधनकारक नाही. मात्र प्रकरणातील वस्तुस्थिती, अपील अर्जात नमूद केलेले मुद्दे विचारात घेऊन, अर्जदारास प्रत्यक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडण्याची संधी द्यावयाची किंवा कसे ते ठरवा.
५. प्रत्यक्ष म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे ठरविल्यास अपील सुनावणीची तारीख निश्चित करुन त्यासंबंधीची नोटीस अपील अर्जदारास तसेच संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकरणास वेळेवर पाठवा, जेणेकरुन नोटीस सुनावणीच्या तारखेपूर्वी मिळून अर्जदार/शिस्तभंगविषयक प्राधिकरणास तयारीसाठी पुरेसा अवधी मिळू शकेल.

६. निलंबन आदेशांविरुद्ध केलेल्या अपीलाचा विचार करताना नियम ४ मधील तरतुदींचा विचार करा व निलंबन समर्थनीय आहे किंवा हे ठरवून निलंबनाचा आदेश कायम ठेवा किंवा रद्द करा.

७. नियम ५ मधील शिक्षा देणारा किंवा शिक्षा वाढविणाऱ्या आदेशांविरुद्ध केलेल्या अपीलाचा विचार करताना खालील मुद्दयांचा विचार करा -

१) शिक्षा देण्यापूर्वी/वाढविण्यापूर्वी नियमांमध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन झाले किंवा कसे ? अनुपालन न केल्यामुळे भारतीय संविधानाच्या किंवा नियमातील तरतुदींचा भंग झाला आहे काय ? व त्यामुळे अर्जदारास अपाय होऊन त्यावर अन्याय झाला आहे काय ?

२) नियम ५ मधील सक्तीची सेवानिवृत्ती, सेवेतून काढून टाकणे किंवा सेवेतून बडतर्फ करणे या शिक्षांपैकी कोणतीही जबरशिक्षा देण्यापूर्वी व खाली नमूद केलेल्या किरकोळ शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यापूर्वी नियम ८ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब केला आहे किंवा कसे ?

अ. विनिर्दिष्ट कालावधीसाठी समयवेतनश्रेणीत खालच्या टप्प्यावर आणणे,

ब. खालच्या पदांवर/श्रेणीमध्ये/सेवेमध्ये आणणे,

क. वेतनवाढी रोखणे, ज्यामुळे कर्मचाऱ्याच्या निवृत्तीवेतनाच्या रकमेवर विपरीत परिणाम होईल.

ड. तीन वर्षांपेक्षा अधिक काळासाठी वेतनवाढ रोखणे,

इ. कोणत्याही कालावधीकरिता एकूण परिणाम म्हणून वेतनवाढी रोखणे.

३) शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने काढलेल्या निष्कर्षाचे प्रकरणातील पुराव्यांवरुन समर्थन होते किंवा कसे ?

४) अपीलीय अधिकाऱ्यांनी गट अ व गट ब च्या अधिकाऱ्यांना कोणतीही जबर किंवा किरकोळ शिक्षा देण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेणे आवश्यक असते. तसा सल्ला घेतला होता किंवा कसे?

५) दिलेली शिक्षा/वाढविलेली शिक्षा, पुरेशी/अपुरी/कडक आहे किंवा कसे...

१)	वर नमूद केलेल्या गोष्टींचा विचार करुन आपले निष्कर्ष कारणांसहीत नमूद करुन शिक्षा कायम करणारा/कमी करणारा/रद्द करणारा आदेश काढा. अपिलीय अधिकाऱ्याने आपल्या निर्णयांची कारणे नमूद करणे आवश्यक आहे. कारणे नमूद न करता काढलेला आदेश न्यायाधिकरण/न्यायालयांकडून रद्दबातल ठरवला जाऊ शकतो.

२)	शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने दिलेली शिक्षा अपुरी आहे व ती वाढविणे आवश्यक आहे असे आपले मत झाल्यास,  प्रथम दिलेली शिक्षा अपुरी आहे असे वाटण्याची कारणे व प्रस्तावित वाढीव शिक्षा नमूद करुन कर्मचाऱ्यास नोटीस पाठवून त्याचे म्हणणे ठराविक वेळेत मांडण्याची संधी द्या. कर्मचाऱ्याने दिलेले म्हणणे विचारात घेऊन आपले निष्कर्ष नोंदवून शिक्षेच्या संदर्भातील योग्य ते आदेश काढा, अशी संधी न देता काढलेला आपला आदेश न्यायाधिकरण/न्यायालयाकडून रद्दबातल होऊ शकतो.

३)	प्रस्तावित वाढीव शिक्षा ही जबर शिक्षा असेल व नियम ८ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे चौकशी झाली नसेल तर तशी चौकशी आपण स्वतः करा अथवा अशी चौकशी करण्यासाठी प्रकरण शिस्तभंगविषयक अधिकाऱ्यांकडे पाठवा.

४)	शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने आदेश काढताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे उल्लंघन झाले असल्यास किंवा चौकशी योग्य तऱ्हेने झाली नाही अशी खात्री झाल्यास, व योग्य ते निष्कर्ष कारणांसहित नमूद करुन शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याचा आदेश रद्द करुन प्रकरण योग्य त्या सूचनांसह शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडे परत पाठवा.

५)	आपण शिस्तभंगविषयक प्राधिकारी या नात्याने दिलेल्या आदेशाला आव्हान देणारे अपील/पुनरीक्षण अर्जावर आपण निर्णय देऊ नका. अशा अपील/पुनरीक्षण अर्जावर कोणी निर्णय घ्यावा याबाबत वरिष्ठांचे आदेश घ्या.

६)	अपील अर्ज करणाऱ्यांविरुद्ध पूर्वग्रहदूषित असू नका. प्रकरणातील वस्तुस्थितीचा अभ्यास करुन नियमातील तरतुदींप्रमाणे योग्य ती कारवाई करा.

७)	अपील अर्जांवर नमूद केलेले सर्व मुद्दे विचारात घेऊन प्रकरणातील वस्तुस्थितीचा अभ्यास करुन नियमांमधील तरतुदींच्या आधारे अपील पत्रांवरील निकाल दिला आहे. हे निकालपत्रांवरुन स्पष्ट होईल असे पहा. निकालपत्र स्वयंस्पष्ट असावे. त्यासाठी निकालपत्र/आदेश सविस्तर झाले तरी हरकत नाही.

८)    वर्ग अ व वर्ग ब च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर लादलेल्या कोणत्याही शिक्षेविरुद्ध (जबर किंवा किरकोळ) राज्य शासनाकडे केलेल्या अपीलावर निर्णय घेण्यापूर्वी लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असते.

## ०५ <u>पुनरीक्षण अर्ज -</u>

१. ज्या आदेशांविरुद्ध अपील करता येते, परंतु असे कोणतेही अपील करण्यात आलेले नाही अथवा ज्या आदेशांविरुद्ध कोणतेही अपील करता येत नाही अशा प्रकरणातील कागदपत्र मागवून प्रकरणात दिलेल्या आदेशांचे पुनरीक्षण करण्याचा अधिकार राज्यपाल तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांना आहे (नियम २५). मात्र आदेशांचे पुनरीक्षण माफक व योग्य (ठशरीपरलश्रश) काळातच करावे. विलंबाने केलेल्या पुनरीक्षणाच्या आधारे अपिलीय प्राधिकाऱ्याने काढलेले आदेश न्यायाधिकरण/न्यायालयांकडून रद्द होऊ शकतात.

२. अपील केले नसेल किंवा जेथे अपील करण्याची तरतूद नसेल अशा प्रकरणात कर्मचारी देखील पुनरीक्षणासाठी अर्ज करु शकतो. मात्र अशा अर्जाचा विचार, पुनरीक्षण करावयाच्या आदेशाची प्रत अर्जदाराला देण्यात आल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत करता येते.

३. पुनरीक्षणासाठी आलेला अर्ज अपीलच आहे असे समजून त्याच पद्धतीने कार्यवाही करावी.

**०६**    अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे सादर केलेल्या अपील अर्ज व पुनरीक्षण अर्जावर वरील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निर्णय द्यावेत, म्हणजे त्यांच्या निर्णयास प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा न्यायालयात आव्हान दिले तरी त्यांचे निर्णयात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण किंवा न्यायालयांकडून हस्तक्षेप केला जाणार नाही व निर्णय कायम केले जातील.

* * * * * * *